**<u>ठळक बातम्या</u>**

- एचपीव्ही लसीकरणाच्या देशव्यापी  मोहिमेचा  प्रारंभ

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राजस्थानातल्या १६ हजार ६८० कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत सुविधांचं लोकार्पण आणि पायाभरणी

- पश्चिम बंगालमध्ये एस आय आर नंतर टप्प्याटप्प्याने मतदार याद्यांचं प्रकाशन सुरु

- इस्त्राएलचा इराणवर हल्ला/ भारतीय नागरिकांनी सतर्क राहावं असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे निर्देश

**आणि**

- कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी आज मुंबईत आघाडीच्या उद्योजकांना भेटणार

**<><><><><>**

एचपीव्ही लसीकरणाच्या देशव्यापी  मोहिमेचा प्रारंभ  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज राजस्थानात अजमेर इथं झाला. गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावं याकरता १४ वर्ष  वयाच्या मुलींना ही लस देण्यात येणार आहे. दरवर्षी १ कोटी १५ लाख मुलींना लस देण्याचं मोहिमेचं उद्दिष्ट आहे. सर्व सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये ही लस मोफत दिली जाणार असून हे लसीकरण ऐच्छिक आहे. आज पाच मुलींना लस देण्यात आली, त्यांच्याशी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला. हे लसीकरण महिला सक्षमीकरणातलं महत्त्वाचं पाऊल असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले…..

**होल्ड- बाईट प्रधानमंत्री**

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज राजस्थानातल्या  १६ हजार ६८० कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत सुविधांचं लोकार्पण आणि पायाभरणी झाली. पिण्याचं पाणी,

रस्ते, जलसिंचन, उर्जा इत्यादी क्षेत्रातले प्रकल्प त्यात आहेत. युवा रोजगार मेळाव्यात त्यांनी २१ हजार ८०० पेक्षा जास्त युवकांना  नियुक्तीपत्रं प्रदान केली. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, माजी मुख्यमंत्री वसुंधराराजे शिंदे कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दुपारी गुजरातमधे साणंद इथं मायक्रोन टेक्नॉलॉजीच्या अत्याधुनिक सेमीकंडक्टर प्रकल्पाचं उद्धाटन होणार आहे. इंडिया सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत साडेबावीस हजार कोटींहून जास्त गुंतवणूक असलेला हा पहिला मेड-इन-इंडिया सेमीकंडक्टर मेमरी मॉड्यूल्सचा व्यावसायिक उत्पादन प्रकल्प असून इथून अधिकृत निर्यातदेखील सुरु होणार आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने हे एक महत्त्वाचं पाऊल आहे. यावेळी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित असतील.

**<><><><><>**

गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी केंद्र सरकारनं सामाजिक सुरक्षा संहिता २०२० लागू केल्यानं या कामगारांसाठी राज्य सरकारला स्वतंत्र महामंडळ स्थापन करता येणार नाही, असं कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आज महाराष्ट्र विधानसभेत सांगितलं. केंद्र सरकारचे कायदे राज्यात लागू केले जाणार आहेत, त्या अंतर्गत असंघटित कामगारांसाठी विविध तरतुदी केल्या जातील असं ते म्हणाले. मुंबई महानगर प्रदेशातल्या मोठ्या रुग्णालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे असं मंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितलं. राज्यातल्या चार हजारांहून जास्त रूग्णालयात ही योजना लागू असून यात अडीच हजारहून अधिक शासकीय रुग्णालयं आहेत अशी माहिती बोर्डीकर यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबई मेट्रो ४चा पहिला टप्पा येत्या एप्रिल महिन्यात खुला करायचं सरकारचं नियोजन आहे, दुसरा टप्पा डिसेंबर २०२६पर्यंत, तर तिसरा टप्पा नोव्हेंबर २०२७पर्यंत खुला करायचं उद्दिष्ट असल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. आमदार निरंजन डावखरे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या मार्गावरच्या ६ स्थानकांची निविदा निघाली होती, पण यातलं गांधीनगर स्थानक आयकॉनिक स्थानक म्हणून उभारायचा निर्णय झाल्याने त्यात बदल करावे लागले. आता यापैकी ५ स्थानकांसाठी एक आणि उर्वरित ५ स्थानकांसाठी एक, अशा २ निविदा पुढच्या १५ दिवसांत काढल्या जातील, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भटक्या कुत्र्यांचं नियमन करण्याची जबाबदारी शिक्षकांवर देण्याचे कोणतेही आदेश कोणत्याही महानगरपालिकेनं दिलेले नाहीत आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नोडल अधिकाऱ्याची नेमणूकही केलेली नाही, असं स्पष्टीकरण नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिलं. आमदार मनीषा कायंदे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. याप्रश्नी नोडल अधिकारी नेमण्याचे निर्देश देऊ, शाळांभोवतीच्या संरक्षक भिंती बांधणं, सुरक्षारक्षक तैनात करणं, तसंच कचरा व्यवस्थापनाचे निर्देश दिले आहेत, असं त्यांनी सांगितलं. आमदार प्रवीण दरेकर, जगन्नाथ अभ्यंकर यांनीही या चर्चेत भाग घेतला.

<><><><><>

निवडणूक आयोगानं पश्चिम बंगालमध्ये एस आय आर अर्थात विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेनंतर टप्प्याटप्प्याने मतदार याद्या प्रकाशित करायला सुरुवात केली आहे. मात्र, या याद्या अद्याप निवडणूक आयोगाचं पोर्टल आणि मोबाईल ॲपवर उपलब्ध करण्यात आली नाही. मसुदा यादीतून वगळलेल्या एकूण

मतदारांची संख्या अजून स्पष्ट झाली नसली तरी बांकुरा जिल्ह्यातल्या सुमारे १ लाख १८ हजारांहून अधिक मतदारांची नावं वगळण्यात आल्याची शक्यता निवडणूक आयोगानं व्यक्त केली आहे. या याद्या प्रकाशित झाल्यानं सुमारे ७ कोटी ८ लाख मतदारांचं वर्गीकरण मंजूर, वगळलेले किंवा निर्णयाअंतर्गत असं करण्यात आलं असून आहे. गेल्या वर्षी ४ नोव्हेंबर पासून पश्चिम बंगालमध्ये एस आय आर प्रक्रिया सुरु झाली होती.

**<><><><><>**

माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजनेसाठी योग्य तरतूद करावी आणि अपंगत्व निवृत्तिवेतनाबाबत प्रस्तावित प्राप्तिकर तरतूद मागे घ्यावी अशी मागणी काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेता राहुल गांधी यांनी केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना पत्र लिहून गांधी यांनी ही मागणी केली आहे. सशस्त्र कर्मचाऱ्यांशी संबंधित या दोन महत्वाच्या समस्यांबाबत त्वरित लक्ष घालणं आवश्यक आहे असं गांधी यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

इस्रायलने आज इराणवर हल्ला चढवला असून देशात आणीबाणी पुकारली आहे. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल कात्झ यांनी ही घोषणा केली. इराणची राजधानी तेहरानमधे प्रचंड स्फोट होऊन दाट धुराचे ढग उठल्याचं प्रत्यक्ष बघणाऱ्यांनी सांगितलं. इराणचे सर्वसत्ताधीश आयतुल्ला खमेनी यांच्या कार्यालयाजवळ हा हल्ला झाला. त्याच वेळी क्षेपणास्त्र प्रतिहल्ल्याचा इशारा देणारे भोंगे इस्राएलमधे सर्वत्र वाजले.

**<><><><><>**

इस्रायलमध्ये राहणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांसाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सूचना जारी केल्या आहेत. तेथील भारतीय नागरिकांना सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. इस्रायलच्या अधिकारी आणि तिथल्या गृह विभागानं जारी

केलेल्या निर्देशांचं काटेकोर पालन करण्याच्या सूचना इस्त्रायलमधल्या भारतीय दूतावासानं तिथल्या भारतीयांना दिल्या आहेत. सर्व भारतीय नागरिकांनी तिथल्या निवाराकेंद्रांजवळ राहावे किंवा आपल्या घर किंवा कार्यालयाजवळच्या सुरक्षित स्थळांची माहिती घेऊन ठेवावी. पुढील सूचना मिळेपर्यंत इस्त्रायलमध्ये अनावश्यक प्रवास टाळावा, असा सल्लाही दूतावासानं दिला आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तेल अवीवमधल्या भारतीय दूतावासाशी ९७२-५४-७५२०७११ आणि कॉन्स वन डॉट तेलअवीव ॲट एमइए डॉट जीओव्ही डॉट इन या मेलवर संपर्क करण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><>**

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी आज मुंबईत आघाडीच्या उद्योजकांना संबोधित करण्याची शक्यता आहे. आज ते मुंबईत अनेक कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहणार असून उद्या नवी दिल्लीला रवाना होणार  आहेत, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. मार्क कार्नी चार दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी आले असून काल त्यांचं दुपारी मुंबईत आगमन झालं. पदभार स्वीकारल्यानंतर कार्नी यांचा हा पहिलाच अधिकृत भारत दौरा आहे. दरम्यान, उद्या ते नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेणार आहेत. दोन्ही प्रधानमंत्र्यांमध्ये ऊर्जा, व्यापार, CEPA करार आणि परस्पर देशांमधले संबंध अधिक दृढ करण्यावर चर्चा होईल, असं मंत्रालयानं स्पष्ट केलं  आहे.

**<><><><>**

संरक्षण, संशोधन आणि विकास संघटनेनं आज ओदिशा किनारपट्टीलगत चंडीपूर इथून एकात्मिक चाचणी केंद्रातून अत्यंत कमी पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालीच्या तीन उड्डाण चाचण्या यशस्वी केल्या. विविध वेग, टप्पे आणि उंचीवरून हवाई मार्गाने अचानक उद्भवणारे संभाव्य धोके निष्फळ ठरवण्यात या संरक्षण क्षेपणास्त्र प्रणालीची क्षमता पुन्हा सिद्ध करण्याच्या उद्देशाने या चाचण्या घेण्यात आल्याचं

संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. या सर्व उड्डाण चाचण्यांदरम्यान वेगाने येणाऱ्या हवाई अडथळ्यांवर क्षेपणास्त्रांनी मात केल्याची माहिती मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

'राष्ट्रीय विज्ञान दिन' आज देशभरात साजरा होत आहे. नोबेल पुरस्कार विजेते ज्येष्ठ शास्त्रज्ञ सी वी रामन यांनी, 'रामन इफेक्ट' हा महत्त्वपूर्ण शोध लावला, त्यांच्या कार्याचं स्मरण म्हणून आजचा दिवस 'विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी देशातले शास्त्रज्ञ आणि संशोधकांना शुभेच्छा दिल्या आहेत. देशातल्या युवकांना सक्षम करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक  वापर करण्याचा संदेश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. तर वैज्ञानिकांचे अथक प्रयत्न देशाच्या यशाचा  मार्ग अधिक सुकर करतो, अशा शब्दात त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. विज्ञान दिनानिमित देशभरात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्र हे विकसित भारत - २०४७ च्या मोहिमेत एक दिशादर्शक ठरणार असून देशातल्या महिला, राष्ट्रीय प्रगतीच्या प्रमुख आधारस्तंभ आहेत, असं प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजय कुमार यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित समारंभाला संबोधित करताना ते बोलत होते. देशामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित क्षेत्रात पदवीधर होण्याऱ्या महिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, असंही प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

टी-20 विश्वचषक स्पर्धेत, आज पाकिस्तानचा सामना श्रीलंकेशी होणार आहे. आजच्या सामन्यातल्या कामगिरीवर पाकिस्तानचं उपान्त्य फेरीतलं भवितव्य अवलंबून आहे.

**//<><><><><>//**